# पोलीस अधीक्षक, पालघर
# पोलीस भरती - २०१७
# उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना

१. पालघर जिल्हा पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांनी शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी करीता दिनांक २२/०३/२०१७ रोजी पासुन पोलीस मैदान, मौजे कोळेगाव, दुध डेअरी विकास प्रकल्पाजवळ, बोईसर रोड, कोळगाव रेल्वे फाटकाजवळ, पालघर पश्चिम येथे बोलविण्यात आलेल्या दिवशी व वेळी हजर रहावे. त्यावेळी उमेदवाराने त्यांना ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेले प्रवेश पत्र, आवेदन अर्ज नजिकच्या काळातील एकाचवेळी काढालेले एकाच साईजचे कमीत कमी ८ पासपोर्ट साईजचे फोटो सोबत आणवेत. ऑनलाईन प्रवेशपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी मध्ये पात्र ठरण्या-या उमेदवारांना चेस्ट क्रमांक व ओळखपत्र देण्यात येईल. सदर चेस्ट क्रमांकावर पोलीस भरतीची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी पोलीस भरतीच्या पुढील प्रक्रियेसाठी त्यांना देण्यात आलेले मुळ ओळखपत्र (चेस्ट क्रमांक) बरोबर ठेवणे उमेदवारांवर बंधनकारक राहील.

३. पोलीस भरतीच्या प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्यावर उमेदवार अपात्र ठरत असल्याचे दिसून, आल्यास सदर उमेदवारांना पोलीस भरतीच्या पुढील प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

४. पोलीस भरतीच्या प्रत्येक टप्यामध्ये दिलेल्या सूचना उमेदवाराने लक्षात ठेवाव्यात. तसेच नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या सुचना तसेच पोलीस अधीक्षक, पालघर यांचे www.palgharpolice.gov.in या संगणक संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सूचना नियमितपणे वाचाव्यात. त्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

५. पोलीस भरतीच्या वेळी उमेदवारांस कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यांस उमेदवार स्वतः जबाबदार राहील त्याकरिता उमेदवारांनी स्वतःची शारिरीक क्षमता विचारांत घेवुन मैदानी चाचणीच्या प्रकारात सहभागी व्हावे.

६. मैदानी चाचणीमध्ये किमान ५० गुण मिळविणे आवश्यक आहे. मैदानी चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविण्या-या उमेदवारांपैकी गुणवत्तेनुसार प्रवर्ग व समांतर आरक्षणनिहाय जागांच्या १:१५ या प्रमाणकाप्रमाणे लेखी परिक्षेसाठी उमेदवारांची तात्पुरती यादी (Provisional list) नोटीस बोर्डावर तसेच www.palgharpolice.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करून त्यांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. त्याबाबतची माहिती उमेदवार यांनी त्यांचे आवेदन अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस (SMS) द्वारे कळविण्यात येईल.

७. कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेकरीता बोलविण्यात येईल.लेखी परिक्षा कोणत्या तारखेस व वेळेस घेण्यात येणार आहे याबाबतचे वेळापत्रक व माहिती www.palgharpolice.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच त्याबाबतची माहिती उमेदवार यांनी त्यांचे आवेदन अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस (SMS) द्वारे कळविण्यात येईल.

८. लेखी परिक्षेचा निकाल आणि अंतिम गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी लेखी परिक्षेनंतर लवकरात लवकर प्रसिध्द करण्यात येईल.

९. भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही चाचणीसाठी येण्याकरिता उमेदवरांस प्रवास खर्च दिला जाणार नाही उमेदवरांनी प्रत्येक पोलीस भरती चाचणी करीता स्वखर्चाने हजर राहावे.

१०. पोलीस भरती ही फक्त गुणेवत्तेवर होत आहे.

११. भ्रष्टाचारी व्यक्ती, दलालापासून सावध राहावे. भूलथापा तसेच अफवावर विश्वास ठेवू नका.

१२. भरतीप्रक्रिया तटस्थपणे, निपक्षपातीपणे व पारदर्शकतेने करण्यासाठी आपण निवड मंडळाला सहकार्य करावे.

१३. पोलीस भरतीसंदर्भात कोणीही आमिष दाखवित असेल, अफवा पसरवीत असेल, दलाली अथवा वशीलीबाजी करित असेल तर खालील नमूद दूरध्वनी क्रमांकावर माहिती देण्यास घाबरू नका.

| | |
|---|---|
| पोलीस अधीक्षक, पालघर | ०२५२५-२५११०० |
| अपर पोलीस अधीक्षक, पालघर | ०२५२५-२९७०१६ |
| पोलीस उप अधीक्षक (गृह) | ०२५२५-२९७०१६ |
| प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष | ०२५२५-२९७००४ |
| अॅन्टीकरप्शन ब्युरो पालघर | ०२५२५-२९७२९७ |

सही/-
( शारदा राऊत )
पोलीस अधीक्षक, पालघर